नि.दि.दा.क्र.१०१/२०१८
नि.क्र.८९

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.२ करीता विधीज्ञ श्री. औताडे यांच्या वतीने शपथेवर पुन्हा सुरु</u> -

८. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत व शिवाजी रोडवरील गाळया संबंधी प्रतिवादी क्र.२ सोबत जी तडजोड झालेली आहे त्या तडजोडी संबंधी नि. दरखास्त क्र.२६/२०१९ न्यायप्रविष्ट आहे. साक्षीदार स्वतः सांगतात की, झालेल्या तडजोडीप्रमाणे ते वागण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मिळकतींच्या मुल्यांकनामुळे आमची तडजोड अंतिम टप्प्यापर्यंत पोहचत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.द.क्र.२६/२०१९ ही न्यायप्रविष्ट असल्याने दावा मिळकतीचे माझ्यात, प्रतिवादी क्र.२ व इतरांमध्ये वाटप झालेले नाही.

९. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप न झाल्यामुळे दावा मिळकतीच्या मुळ स्वरुपात संमतीशिवाय व परवानगीशिवाय बदल करण्यात येवू नये असे प्रतिवादी क्र.२ यांचे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये मी जे काही बदल केले त्या संदर्भात मी प्रतिवादी क्र.२ व इतरांची लेखी संमती व लेखी परवानगी घेतलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.२ यांनी कोणत्या तारखेला हरकत अडथळा केला ती तारीख मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ यांचे दावा मिळकतीमधील हक्क डावलण्याच्या उद्देशाने त्यांचा दावा मिळकतीशी संबंध नसल्याचे मी दाव्यात व पुराव्यात खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, कारण नसतांना मी प्रतिवादी क्र.२ यास या दाव्यात समाविष्ट केले आणि त्याच्याविरुध्द दाव्यात आणि पुराव्यात खोटे आरोप केले आहे.

<u>प्रतिवादी क्र.२ यांच्या विधिज्ञानी प्रतिवादी क्र.१ यांनी घेतलेला उलटतपास स्वतःकरीता अंगीकृत केला.</u>

<u>उलटतपास पूर्ण.</u>

<u>फेरतपास नाही.</u>

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by
ASHISH BIHARILAL
MARLECHA
Date: 2025.10.14
17:22:34 +0530

(आशिष बि. मरलेचा)

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक १४/१०/२०२५